# दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १२०/२०२२
# रमाबाई अरुण साबे अधिक तीन विरुध्द निरंक
# नि.१ वर आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे आहे की, **मयत अरुण किसन साबे** यांचा मृत्यु दिनांक ०३/०८/२०२० रोजी झाला आहे. मयत अरुण यांचा मुलगा अमोल अरुण साबे यांचा मृत्यु दि. ३०/०१/२०२२ रोजी झाला आहे. अर्जदार हे **मयत अरुण किसन साबे** यांचे कायदेशीर वारस आहे. त्यामुळे त्यांनी सदर वारसाला प्रमाणपत्र मिळण्याबाबत विनंती केली आहे.

३. प्रकरणात अर्जदारातर्फे नोंदविण्यात आलेल्या पुराव्याचे व दस्तऐवजांचे अवलोकन करता पुढील मुद्दे या न्यायालयाचे समक्ष आदेशासाठी उपस्थित झाले. ते मुद्दे व त्याबाबत करण्यात आलेल्या चर्चेला अनुसरुन आलेल्या निष्कर्ष पुढील प्रमाणे नोंदवित आहे.

| अ. क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १ | अर्जदार हे सिध्द करतात काय की, त्यांचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहेत काय ? | : | **अंशतः होय.** |
| २ | आदेश काय ? | : | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमिमांसा

४. **मुद्दा क्र.१ करीता** – प्रस्तुतचा अर्ज दाखल झाल्यानंतर या अर्जाबाबत नि.१ वरील आदेशान्वये जाहीरनामा काढण्याबाबत आदेशीत करण्यात आले. त्यानूसार जाहीरनामा प्रकाशीत करण्यात आला. सदरहू जाहीरनाम्याबाबत आजपावेतो कोणीही आक्षेप, उजर व हरकत नोंदविलेली नाही.

५. अर्जदाराचे विद्वान वकील यांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांचा युक्तीवाद नि.१ प्रमाणे तसेच अभिलेखावर उपलब्ध असलेल्या पुराव्याप्रमाणे केला. अंतिमतः त्यांनी असे नमुद केले की, आजपावेतो जाहीरनाम्यास कोणीही आक्षेप, उजर व हरकत नोंदविली नाही म्हणून त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

६. अर्जदाराने प्रस्तुत अर्जात केलेली कथने नाकारण्यासाठी कोणत्याही प्रकारची हरकत आजपर्यंत न्यायालयासमोर आलेली नाही. तसेच अन्य कोणताही इसम मृत व्यक्तीचा वारस असल्याचा दावा करण्याकरीता हजर झालेला नाही, अगर कोणताही आक्षेप, उजर तथा हरकत नोंदविण्यात आलेली नाही.

७. प्रस्तुत अर्जाबाबत अर्जदार क्र. २ यांनी निशाणी क्र. ११ नुसार स्वतःचा पुरावा प्रतिज्ञापत्रावर सादर केला आहे व सदरहू पुरावा आजपावेतो अबाधीत असून त्याला कोणीही आव्हाण दिले नाही. त्यानंतर अर्जदारांनी पुरसीस दाखल करुन त्यांची पुराव्याची बाजू बंद केली.

८. अर्जदाराने पुराव्यासोबत खालील दस्तऐवज दाखल केलेले आहे;-

| अ.क्र. | दस्ताचे स्वरुप | नि.क्र. |
|---|---|---|
| १ | मयत अरुण यांच्या मृत्यु प्रमाणपत्राची मुळ प्रत, | १२ |
| २ | मयत अमोल यांच्या मृत्यु प्रमाणपत्राची मुळ प्रत, | १३ |
| ३ | सरपंच, ग्रामपंचायत धानोरा यांनदी दिलेल्या वारसाचा दाखला | १४ |
| ४ | अर्जदार क्र. १ ते ४ यांच्या आधार कार्डच्या पडताळणी केलेल्या छायांकित प्रती, | १५ ते १८ |
| ५ | दिनांक १२ नोव्हेबर, २०२२ ची दैनिक महासागरची प्रत, | १९ |

९. अर्जाचे (निशाणी क्र.१) अवलोकन केल्या नंतर ही बाब प्रकर्शाने जानवते की, अर्जा मध्ये शासकीय व निम शासकीय कार्यालय, योजनांचा लाभ घेण्यासाठी तसेच औपचारीक

कामा साठी प्रमाणपत्राची मागणी केली आहे. परंतु महाराष्ट्र न्यायालयीन शुल्क अधिनियम, १९५९ [The Maharashtra Court Fees Act, (Bom. Act No. XXXVI of 1959)] च्या परिशीष्ट-एक (Schedule-I) नुसार संपत्तीच्या किंमती वर न्यायालयीन मुद्रांक / शुल्क द्यावा लागतो. परंतु अर्जामध्ये तसे नमुद केलेले नाही. त्यामुळे हे म्हणने योग्य होईल की, प्रस्तुत चे प्रकरण मंजुर झाल्या नंतर मिळणारे प्रमाणपत्र हे शासकीय व निम शासकीय कार्यालयात, योजनांचा लाभ घेण्यासाठी तसेच औपचारीक कामा साठी वापरता येणार नाही, कारण की, मोघम प्रमाणपत्र देणे न्यायोचीत होणार नाही.

**१०.** प्रस्तुत चे प्रकरण मंजुर झाल्या नंतर मिळणारे प्रमाणपत्र हे कोणत्याही मालमत्तेसाठी, संपत्तीसाठी वापरता येणार नाही, कारण की, मोघम प्रमाणपत्र देणे न्यायोचीत होणार नाही.

**११.** उपरोक्त परिस्थितीत प्रस्तुत अर्जदार हे **मयत अरुण किसन साबे** यांचे कायदेशीर वारस आहेत, असा वारस दाखल देण्यास कोणताही अडथळा दिसून येत नाही. करीता मुद्दा क्र.१ साठी अंशतः होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**१२.** **मुद्दा क्र.२ करीता** – मुद्दा क्र.१ करीता अंशतः होकारार्थी निष्कर्ष नोंदविल्यामुळे तसेच मुद्दा क्र.२ च्या उत्तराकरीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.
२. अर्जदार हे **मयत अरुण किसन साबे (मृत्यु दिनांक ०३/०८/२०२०)** यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचा दाखला योग्य तो न्यायालयीन मुद्रांक दिल्यानंतर देण्यात यावा.
३. अर्जदार यांना निर्देश देण्यात येते की, भविष्यात कोणी सदरच्या मयतास वारस म्हणून हक्क दाखविल्यास सदरचे वारस प्रमाणपत्र हे न्यायालयास अभ्यार्पित करावे लागेल. त्यांनी या आशयाचे शपथपत्र न्यायालयात दाखल करावे.

४. प्रस्तुत चे प्रकरण मंजुर झाल्या नंतर मिळणारे प्रमाणपत्र हे शासकीय व निम शासकीय कार्यालयात, योजनांचा लाभ घेण्यासाठी तसेच औपचारीक कामासाठी वापरता येणार नाही.

५. प्रस्तुत चे प्रकरण मंजुर झाल्या नंतर मिळणारे प्रमाणपत्र हे कोणत्याही मालमत्तेसाठी, संपत्तीसाठी वापरता येणार नाही.

Digitally signed by CHANDRAMOHAN MOHAN KHARKAR
Date: 2022.12.20 15:56:56 +0530

(सी. एम. खारकर)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
जळगांव (जामोद) जि.बुलडाणा

ठिकाण : जळगांव (जामोद)
दिनांक : १९/१२/२०२२